ePaper

**प्रशांत कोरटकर याला काळे फासणाऱ्यास संभाजी ब्रिगेडकडून 1 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर**




| वर्ष - 8 | अंक - 221 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 26 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## ‘छावा’ ला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची किनार!

# अभिनेत्याची पोटदुखी लई, अमोलभाऊंची कोल्हेकुई!

## ‘शिवशाही’ मध्ये गद्दार कोण ? : ब्राह्मण का इतर?

| मुंबई-पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज




**सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असलेला विकी कौशल चा ‘छावा’ चित्रपट एकीकडे..त्याचा शेवट आणि अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांच्या ‘संभाजी’ या मालिकेचा शेवट, यात मोठी तफावत आढळल्याने ब्राह्मण - ब्राह्मणेतर असा वाद उफाळून आला आहे. डॉ. कोल्हे यांनी ब्राह्मणांना ‘टार्गेट’ केले होते, तर ‘छावा’ मध्ये परिस्थिती अगदीच वेगळी आहे.**

छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभुराजे यांनी ज्या हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्यामध्ये अठरापगड जातीचे मावळे त्यांच्या मदतीला धावले होते. तथापि, प्रत्येक गोष्टीत राजकारण खेळणाऱ्या डॉ. कोल्हे यांच्या मालिकेत विकृतीचे प्रदर्शन झाले आणि गद्दारीचा ठपका फक्त ब्राह्मणांच्यावर ठेवला गेला, हे अगदी ताजे उदाहरण आहे. आता, मात्र कोल्हे यांना जनतेनेच प्रश्न विचारल्यामुळे त्यांची भंबेरी उडाली आहे.

### ‘छावा’चे यश पाहून पोटदुखी

‘छावा’ सिनेमा प्रदर्शित झाला, त्याला प्रचंड यश मिळाले आणि इकडे अभिनेता डॉ. कोल्हेंना पोटदुखी सुरु झाली. आता आपले महत्व संपले, हे त्यांच्या लबाड मनाच्या लगेच लक्षात आले. समस्त मराठींच्या आणि हिंदूंच्या नजरेतून पूर्णतः उतरू, हे त्यांच्या मनात खोलवर गेले आणि त्यांनी व्हिडिओ जारी केला. एकाचवेळी ‘बामनां’ चा त्या ‘बामन’ नेत्याचा आणि समस्त संघ, भाजपाचा वचपा काढता येईल, यासाठी त्यांनी युक्ती वापरली आहे



कोल्हेंची नेमकी पोटदुखी, ‘छावा’ सिनेमा..कारण नवा संभाजी.. खराखुरा संभाजी लोकांनी त्या विकी कौशलच्या अभिनयात अनुभवला.. बघितला, त्यामुळे यापुढे आपल्याला मराठी माणूस संभाजी म्हणून कदापिही स्वीकारणार नाही, हे कोल्हेंच्या लक्षात आले. यापुढे जर तुम्हाला महाराष्ट्राने सिनेमा किंवा नाटकातून संभाजी म्हणून स्वीकारले जाणार नाही, हे देखील त्यांना समजले म्हणून त्यांचा थयथयाट सुरू आहे.

### इंद्रजित सावंत यांची भूमिका

ज्येष्ठ इतिहासकार इंद्रजित सावंत यांनी या संदर्भात अतिशय समतोल भूमिका मांडली आहे. तथापि, त्यांना कोणीतरी एक भंपकाने दूरध्वनीवरून उलट सुलट शब्द वापरून त्रास दिल्याचा आरोप झाला आहे. इंद्रजित सावंत हे वारंवार छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभुराजे यांच्या पराक्रमाविषयी सांगत असतात, त्यांच्या अठरापगड जातींविषयी सांगताना कधीही ब्राह्मण, ब्राह्मणेतर वाद उकरून काढत नाहीत, हे पण लक्षात घ्यायला हवे.

### गद्दार म्हणणे कोणालाच सहन होणार नाही !


‘छावा’ चित्रपटामध्ये अनेक मराठा सरदार औरंगजेबाला फितूर होऊन त्याची चाकरी पत्करतात, असे दाखवले गेले आहे, या उलट कोल्हे यांच्या मालिकेमध्ये फक्त आणि फक्त अनाजीपंतांसह दोन ब्राह्मणांचा गद्दार म्हणून उल्लेख केला गेला आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही छत्रपतींशी विद्रोह करणाऱ्यांची यादी प्रसिद्ध झाली असून त्यात दोन ते तीन ब्राह्मण आहेत, आणि चाळीसपेक्षा जास्त ब्राह्मणेतर आहेत, याची दखलही घ्यायला हवी. अर्थात, शिवराय आणि शंभुराजे यांचा पराक्रम एवढा मोठा आहे, की त्याचे गुणगान करणे महत्त्वाचे आहे, गद्दारी चा संबंध कुठेही येत नाही !

# पुणे पोलिसांचा गजा मारणेला दणका!

## मुरलीधर मोहोळांच्या निकटवर्तीयाला मारहाण प्रकरणी अटक

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याचे खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या माणसाला मारहाण केल्याप्रकरणी आरोपी गजा मारणेला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. गजा मारणेला कोथरूड पोलिसांनी अटक करण्यात आली आहे. मुरलीधर मोहोळ यांचे निकटवर्तीय असलेले देवेंद्र जोग यांना मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणी आता गजा मारणेला अटक करण्यात आली आहे. सध्या पोलीस याप्रकरणातील इतर आरोपींचाही शोध घेत असल्याची माहिती आहे.**



आज सकाळीच पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दम दिला होता. त्यानंतर आता कोथरुड पोलिसांनी जगा मारणेला अटक केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी पूर्वी ३ आरोपींना अटक केली होती. सध्या दोन अरोपी फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरु आहे. गजा माणेची चौकशी केल्यानंतर उद्या त्याला न्यायालयात हजर केलं जाणार आहे.देवेंद्र जोग मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी बाब्या पवारला देखील कोथरूड पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. देवेंद्र जोग मारहाण प्रकरणातील अटक केलेल्या तीन आरोपींवर पोलिसांनी मक्को लावला होता. तसेच, मारणे टोळीला नेस्तनाबूत करण्याची पोलिसांची भूमिका असून एकूण २७ आरोपी आमच्या रडारवर असल्याचं समोर आलं होतं. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मारणे टोळीतील गुंडांची माहितीही मागवल्याचं समोर आलं होतं.

### नेमकं प्रकरण काय?

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी म्हणजेच १९ फेब्रुवारीला देवेंद्र जोग हे त्यांच्या वैयक्तिक कामनिमित्त दुचाकीवरुन भेलेनगर परिसरात गेले होते. तेथे भेलकेनगर चोकात मारणे टोळीतील काहींनी मिरवणूक काढली होती. चौकात जाण्यासाठी जागा न मिळाल्यामुळे त्यांनी विचारणा केली. त्याचा राग आल्याने मारणे टोळीतील लोकांनी त्यांना थांबवून शिवीगाळ केली आणि त्यांना मारहाण केली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. या लोकांनी देवेंद्र जोग यांना दुचाकीवरुन पाडून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली त्यानंतर तेथून पळ काढला होता. या घटनेने मुरलीधर मोहोळ यांनी याप्रकरणी संताप व्यक्त केला होता. मी माझ्या पुण्यात असं काही चालू देणार नाही. गुन्हेगारावर गुन्हा दाखल करत कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या होत्या.

देवेंद्र जोग हे आयटी अभियंता असून भाजपचे कार्यकर्ते आहेत. त्यांना मारहाण झाल्यावर कोथरूड पोलिसांनी सुरुवातीला मारहाणीची कलमे दाखल केली होती. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आल्यावर त्यामध्ये आरोपींविरोधात खुनाच्या प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्ह्याचे कलम वाढवण्यात आले. जोग हे १९ फेब्रुवारी रोजी घरी जाताना रस्त्यावर गर्दी असल्याने ते बाजूला थांबले होते. त्यावेळी गाडीचा धक्का लागल्याच्या कारणावरून चौघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी, पट्ट्याने बेदम मारहाण केली. त्यामध्ये त्यांना जबर दुखापत झाली. त्याबाबत त्यांनी वडिलांसोबत कोथरूड पोलिस ठाण्यात जात फिर्याद नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजनुसार आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

### गुंड गजा मारणेचं आत्मसमर्पण

पुण्याचा कुख्यात गुंड गजा मारणेवर पुन्हा एकदा मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, या गुन्ह्यामध्ये गुंड गजा मारणे हा सहभागीही नव्हता झाला. परंतु टोळी प्रमुख असल्यामुळे आज पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्याच्यावर मोक्का लावणार असल्याची माहिती दिली. दरम्यान सायंकाळी ५ च्या सुमारास स्वतः गजानन मारणे कोथरूड पोलीस ठाण्यात हजर झाला. यावेळी पोलिसांनी त्याला अटक केली. यावेळी त्याची आई लक्ष्मीबाई मारणे सोबत हजर होत्या. मुलावर पुन्हा मोक्का लागणार असल्यामुळे आई गजा मारणे याच्यासोबत पोलीस ठाण्यात आली होती. केंद्रीय मंत्री, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यकर्ता देवेंद्र जोगला मारहाण केल्याप्रकरणी कुख्यात गुंड गजानन मारणे याच्यासह त्याच्या टोळीविरोधात मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या मारहाणीवेळी स्वत: गजा मारणे जरी घटनास्थळी नसला तरी टोळी प्रमुख म्हणून गजा मारणेला अटक केली आहे. कोथरूड पोलीस ठाण्यात आणल्यानंतर गुंड गजानन मारणेला पोलिसांनी जमिनीवर बसण्याचा दम दिला आणि कुख्यात गुंड गजा मारणे हा जमिनीवर बसला.

---

# वाहतूक पोलिसांना सौजन्याचे धडे!

## वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रस्त्यावर होणारे वादाचे प्रसंग टाळणे, अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या धर्तीवर पुणे पोलिसांनी वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. प्रशिक्षण सत्रात सहभाग झालेल्या पहिल्या तुकडीतील ६५ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.**




मुंबईच्या धर्तीवर पुणे पोलीस दलात वाहतूक शाखेत काम करणाऱ्या पोलिसांसाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार आहे. अद्याप या प्रशिक्षण संस्थेस जागा उपलब्ध झाली नाही. मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती होण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस दलांतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे. वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली असून, पहिल्या तुकडीतील पाच अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयात मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेले अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त अमोल झेंडे यावेळी उपस्थित होते. सॉफ्ट स्किलच्या संचालक मंजिरी गोखले, सुरेश गोखले, उर्मिला दीक्षित, प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी अनिल पंतोजी, प्रकाश जाधव, अमित गोंजारी, निवृत्त सहायक पोलीस आयुक्त विजय पळसुले, सुरेंद्र देशमुख, पोलीस उपनिरीक्षक रघतवान, तसेच जहाँगीर रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांनी प्रशिक्षण वर्गात सहभागी झालेल्या वाहतूक पोलिसांना मार्गदर्शन केले.

### पोलिसांनी या प्रशिक्षण वर्गाचा उपयोग होणार

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वाहन कायदा, तंत्रज्ञान, इ-चलन यंत्राचा योग्य वापर, नागरिकांशी संवाद कौशल्य, अपघातग्रस्तांवर तातडीने करण्यात येणारे उपचार याबाबतची माहिती मिळाली आहे. वाहतूक नियमन करताना पोलिसांनी या प्रशिक्षण वर्गाचा उपयोग होणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

## नागरिकांच्या रेकॉर्डब्रेक गर्दीने

# पवनाथडी जत्रेचा समारोप!

## पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून सुमारे 1.5 ते 1.25 कोटी रुपयांची उलाढाल

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरी आणि ग्रामीण संस्कृतीने नटलेल्या चार दिवसीय पवनाथडी जत्रेचा सोमवारी समारोप झाला. या जत्रेस नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावर्षी सुमारे ४ ते ५ लाख लोकांनी पवनाथडी जत्रेस भेट देऊन विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला, वस्तू खरेदी केल्या आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावली. तसेच सर्व सहभागी बचत गटांची सुमारे १.५ ते १.२५ कोटी रुपयांची उलाढाल या पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून झाली, अशी माहिती समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली.**



महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्ये विकसित व्हावी तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने दि.२१ ते २४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी या पवनाथडी जत्रेचा समारोप झाला. या समारोप कार्यक्रमावेळी सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उप आयुक्त अण्णा बोदडे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, प्रशासन अधिकारी पुजा दुधनाळे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसदस्य अशोक सोनवणे, सागर आंगोळकर, सुषमा तनपुरे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा ठाकर, स्वाती गुरव, अनुश्री धोत्रे तसेच विविध विभागांचे महापालिका अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. बचतगटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीचे ३८६ स्टॉल, महाराष्ट्रीयन मराठमोळ्या शाकाहारी पदार्थांचे २१७ स्टॉल, तर मांसाहारी पदार्थांचे १३० तसेच दिव्यांग बचतगटांना ०५, सामाजिक संस्था १४, तृतीयपंथी बचतगट ०४ असे एकूण ७५६ स्टॉल पवनाथडी जत्रेमध्ये होते. सोडत पद्धतीने स्टॉल वाटप करताना काही महिलांच्या हाती काढण्यात आलेल्या

### महिला बचत गटांचा सहभाग वाढविण्यावर भर

त्यामध्ये नानाश्री महिला बचत गट, ब्राईट महिला बचत गट, नवीन परिवर्तन महिला बचत गट, अश्विनी स्वयंसिद्धा महिला बचत गट, केजीएम महिला बचत गट, शिवसंगमेश्वर महिला बचत गट यांचा समावेश होता. तसेच यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात तृतीयपंथी, दिव्यांग बचत गट आणि जनरल, शाकाहारी, मांसाहारी स्टॉलधारक महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महापालिका आणि टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्ह्ज ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षमा प्रकल्प राबविला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत ५,००० महिला बचत गटांना कौशल्य विकास, आर्थिक साक्षरता आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सध्या २,५५६ बचत गट या प्रशिक्षणाचा लाभ घेत असून महिलांना स्वयंरोजगार निर्माण करून देण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हा प्रकल्प महत्वांकाक्षी ठरत आहे.

---

## रस्त्याच्या बाजूची जागा कचरामुक्त करून बनवला 'सेल्फी पॉईंट'!

## महापालिकेच्या आरोग्य विभागाचे अनोख्या उपक्रमाचे कौतुक

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड : पिंपरी-चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने विविध उपक्रम सुरू केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी असा परिसर स्वच्छ करून तेथे 'सेल्फी पॉईंट' केले जात आहेत. अशा जागांवर सेल्फी काढण्यासाठी नागरिकांचीही लगबग वाढू लागली आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक जागा कचरामुक्त करीत तो परिसर सुंदर करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक २३ येथील संजीवनी बिल्डींग कॉर्नर येथील परिसर कचरामुक्त करत तो परिसर सुशोभित केला आहे.

कचऱ्यातील टाकाऊ टायरचा तसेच झाकणाचा वापर करत आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी परिसर कचरामुक्त करत सुंदर 'सेल्फी पाईंट' तयार केलाय. तसेच आजबाजूच्या परिसराची स्वच्छता करून त्या जागेला आकर्षक बनवण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी देखील आरोग्य विभागाच्या या कामाचे कौतुक केले असून सगळ्यांसाठी हा सेल्फी पाईंट आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतोय.


उपआयुक्त सचिन पवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड महापलिका क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी कुंडलिक दरवडे, मुख्य आरोग्य निरीक्षक शशिकांत मोरे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे, आरोग्य सहाय्यक सचिन उघडे यांच्यासह आरोग्य विभागातील इतर कर्मचाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

या उपाययोजनांमुळे गेल्या काही दिवसापासून येथे कचरा टाकणे बंद झाले असून स्थानिक नागरिकांकडून आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे. हा परिसर कचरामुक्त करण्यासाठी आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक शंकर घाटे, योगेश फल्ले, आरोग्य निरीक्षक प्रणय चव्हाण यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### पिंपळे गुरव येथे "वेस्ट टू आर्ट'

पिंपळे गुरव येथील महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग 'ड' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मधील विजयनगर बस स्टॉप येथील ठिकाण संपूर्ण कचरामुक्त करून त्या परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. टाकाऊ वस्तूंचा वापर करून 'वेस्ट टू आर्ट' संकल्पनेंतर्गत खराब झालेले टायर, पुठ्ठा, मातीचा माठ, टाकाऊ सिमेंटचे पाईप यांचा उपयोग करून आकर्षक सेल्फी पॉईट तयार करण्यात आला आहे. तसेच येथे आरोग्य व पर्यावरण विषयक जनजागृती करणारे सामाजिक संदेश लिहिण्यात आले आहेत.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### “मला जनप्रियत्व फार आवडते.”

इथून जाणाऱ्या मंडळींना निरोप देताना मला खरोखरच फार वाईट वाटते. पुन्हा आपली भेट होईल की नाही ते काही सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी अत्यंत प्रेमाने वागा. प्रेमाने जग जिंकता येते. तुम्ही माझ्यापासून जनप्रियत्व शिका. मला जनप्रियत्व फार आवडते. कारण जो लोकांना आवडतो, तोच भगवंताला आवडतो. जो नि:स्वार्थी असेल त्यालाच जनप्रियत्व येईल. जो भगवंताच्या इच्छेने वागेल त्यालाच जनप्रियत्व येईल. आपण आपल्यासाठी जे करतो ते सगळ्यांसाठी करणे, हे भगवंताला आवडते. आपण आपल्यापुरते न पाहता सर्व ठिकाणी भगवंत आहे असे पहावे. प्रत्येकाला आपण हवेसे वाटले पाहिजे. असे वाटण्यासाठी लोकांच्या मनासारखेच वागले पाहिजे किंवा त्यांना आवडेल तेच बोलले पाहिजे असे नाही. प्रेम करायला कशाचीही जरूरी लागत नाही; पैसा तर बिलकूल लागत नाही, हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. जगात कुणी कधी भोगली नसेल एवढी गरिबी मी भोगली आहे. अशा गरिबीमध्ये राहूनही माझे अनुसंधान टिकले, मग तुम्हाला ते टिकवायला काय हरकत असावी ? मी जर काही केले असेल तर मी कधीही कुणाचे अंत:करण दुखवले नाही. तेवढे तुम्ही सांभाळा. जो जो कोणी मला भेटला, तो तो मी आपलाच मानला. मी नुसता खेळ मांडला आणि तो खेळलो; त्यामुळे त्याचे सुखदु:ख मला कधी बाधले नाही. नाम घ्यायची इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून मी पुन्हा जन्मास आलो. मला तुम्ही सगळे रामरूप दिसत आहात. मला जे सांगायचे असेल ते मारुतीरायाला सांगावे म्हणजे ते मला कळते. माझा मनुष्य कुठेही असला तरी तो माझ्याकडेच येणार. मला दुश्चित्तपणा अगदी आवडत नाही. ज्यांनी माझी निंदा केली त्यांना तर मी कोण हे कळले नाहीच; पण ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना मी कोण आहे हे त्याहून कळले नाही. प्रत्येकाला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे, मी मात्र वागायचा तसाच वागेन; हे कसे शक्य आहे ? नाम घेतल्याने आपले सर्व अवगुण आपल्यालाच कळून येतील याबद्दल खात्री बाळगा आणि अंत:करणपूर्वक नाम घ्या. एक भगवंताचे नाम घट्ट धरावे, त्यामधे अती उत्कटता ठेवून एकतानता करावी आणि स्वत:ला पूर्ण विसरून जावे. ‘मी नाम घेतो’ हे देखील विसरून जावे. हाच खरा परमार्थ होय. नामामधे एकतानता होण्यासाठी भगवंताच्या साक्षित्वाने वागा; हवे-नकोपण टाकून द्या; राम कर्ता ही भावना ठेवा; विषय मालकीने भोगा; आपला गुण भगवंताकडे लावा; रामाला आपले सुखदु:ख सांगा; देहभोगाला कंटाळू नका; काळजी ‘घ्या’ पण काळजी ‘करू’ नका आणि निर्भय बना आणि अशा रीतीने जिवंतपणी आपले मरण पहा.



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# साहित्य संमेलनाचा ‘फार्स’, कुणाच्या चमकोगिरीसाठी ?

**नवी दिल्लीमध्ये मोठ्या थाटामाटात आणि झगमगटात 98 वे साहित्य संमेलन पार पडले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर या अध्यक्षा, तर ज्येष्ठ नेते शरद पवार हे स्वागताध्यक्ष होते. दरवर्षीप्रमाणे साहित्य संमेलन आले आणि पार पडले.. त्यात नेमके काय घडले आणि साहित्याच्या वाढीसाठी, प्रचारासाठी किंवा प्रसारासाठी नेमके काय निर्णय घेण्यात आले, कोणते ठराव मंजूर झाले, हे मात्र साहित्यप्रेमींना समजलेच नाही !**

### चमकोगिरी झाली, साहित्याचे काय?

नेमके कोणाला मिरवण्यासाठी या साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते, याचा उलगडा झाला नसला तरी, ते लपून राहिलेले नाही. ‘ नेमेची येतो पावसाळा’ या उक्तीप्रमाणे यावेळीही साहित्य संमेलन आले, ज्यांना चमकोगिरी करायची होती, त्यांची करून झाली, निधी घेऊन सरकारच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या साहित्यिकांनी पुन्हा सरकारवरच टीकास्त्रे सोडली, पण यावेळी अभिजात दर्जा मिळालेल्या मराठी साहित्याच्या उद्धारासाठी काय करता येईल हे ठरवायला सगळेजण विसरून गेले !

### मराठी साहित्याचा दर्जा, पुस्तकांचे खप..

मराठी साहित्य मिळणाऱ्या पुस्तकांच्या दुकानात सहज चक्कर मारली, तर पुस्तकांचे जगनाला भिडलेले दर प्रथम लक्षात येतात. साहित्य खपत नाही, त्यामुळे कमी प्रतींची आवृत्ती, आणि कमी प्रती छापल्यामुळे जास्त किंमत, अशा दुष्टचक्रात मराठी साहित्य सापडले आहे.. पण, त्याच्या प्रचाराची किंवा प्रसाराची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.

### मिरवण्याची हौस भागवली..

हल्लीच्या बदलत्या जमान्यात ज्याप्रमाणे ‘डेस्टिनेशन मॅरेज’ ला विनाकारण भरपूर महत्व आले आहे. जवळ पैसे बाळगून असलेले नातेवाईक आणि वऱ्हाडी यांना बरोबर घेतात आणि दूर कुठेतरी जाऊन लग्न समारंभ उरकतात, ही हल्लीची जीवनशैली! जेमेतेम पैसे असलेले जवळपास कुठेतरी जाऊन गोतावळ्याच्या साक्षीने लग्न उरकतात.. काही राजकारणी सुद्धा आपल्याला पाहिजे असलेल्या कार्यकर्त्यांना घेऊन एखाद्या ठिकाणी जातात आणि मनातील मुद्दे पटवून देण्यासाठी भाषणाची हौस भागवतात, तसाच प्रकार यावेळीही साहित्य संमेलनात झाला आहे.



### साहित्यिक कसले, राजकीय कार्यकर्ते ?

लग्न उरकून घेताना वधू आणि वर अशा दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते कोंबून नेले जातात, तोच प्रकार साहित्य संमेलनात झाला. शरद पवारांनी दिल्लीत भरविलेल्या साहित्य संमेलनात जे काही घडले ते अक्षरशः लाजिरवाणे, किळसवाणे आणि केविलवाणे ठरले आहे ही वस्तुस्थिती! थोडक्यात, शरद पवार यांनी त्यांच्या पुणेकर सवंगड्यांच्या भरवशावर आणि संजय नहार यांच्या खांद्यावर अत्यंत खुबीने बंदूक ठेवून तिकडे थेट पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत मोदींवरच नेम धरून चाप ओढला, पण पवार यांचा यावेळीही नेम चुकला आणि बूमरँग होऊन हीच गोळी पवारांना स्वतःलाच जखमी करून गेली, हे प्रत्येकाच्या लक्षात आले ! वास्तविक, शरद पवारांनी उभ्या राजकीय हयातीत सतत जे उथळ राजकीय डावपेचांचे कार्यक्रम राबवून एकाच वेळी अनेक गेम केले, एका दगडात अनेक पक्षी मारले, ते दिवस आता पूर्णतः इतिहासजमा झाले आहेत हे पवारांना आता कुणीतरी सांगायला हवे. तरीही पवारांनी नेहमीचे तेच ते पोरकट आणि कारस्थानी गेम खेळून पुन्हा राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे किंवा कोणती बळकट करणे अशी उचापत केली आहे, हे दुर्दैवाने म्हणावे लागते.

### संजय नहार यांच्या खांद्यावर बंदूक

पवारांनी उथळ प्रसिद्धी मिळवणाऱ्या आणि हपापलेल्या संजय नहार यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून एकाचवेळी स्वतःचे हसे तर करून घेतलेच, पण नहार यांचे थेट देवेंद्र फडणवीस आणि मोदी यांच्याकडे असलेले महत्व कायमस्वरूपी संपवून उघड्या झालेल्या नहार यांना पार नागडे करून ठेवले आहे. कोणाची नाही एवढी नाचक्की नहार यांची झाली आहे.

### साहित्य कशाशी खातात?

प्रत्यक्ष साहित्याशी दुरान्वयानेही संबंध नाही. ज्यांना साहित्य कशाशी खातात, हे ठाऊक नाही आणि नव्हते, असे जवळपास एक ते दीड हजार पुणेकर म्हणजेच शरद पवार यांच्या पक्षातील उरल्यासुरल्या कार्यकर्त्यांना आणि नहार यांच्याकडे असलेल्या ‘हौशे- गौशे- नौशे’ मित्रमंडळींना बरोबर घेऊन, पुण्यातून ‘खाणे पिणे’ उरकून आणि पुढे त्यातील अनेकांची ‘सोय’ लावून दिल्लीत साहित्य संमेलनासाठी नेण्यात आले. पण, ही मंडळी ऐनवेळी आपल्याला कशासाठी आणले आहे, हेच विसरून गेल्याचे दिसले.

### नरेंद्र मोदींच्या प्रत्येक वाक्यावर टाळ्या!

नेलेल्या साऱ्यांनी दुर्दैवाने मोदींच्या प्रत्येक महत्वाच्या वाक्यावर टाळ्या पिटल्या, कांहींनी तर शिट्याही फुंकल्या. थोडक्यात, संपलेल्या पवारांनी समस्त साहित्यिकांना अपमान करीत त्यांना अंधारात ठेवून त्यांच्या साक्षीने आणि उपस्थितीत दिल्लीतल्या साहित्य मंडपात पुण्यातल्या कार्यकर्त्यांना नेऊन त्यांच्या राष्ट्रवादीचा मेळावा पार पाडला. तो देखील भाजपाच्या मोदी आणि फडणवीस, यांच्या उपस्थतीत घडवून आणला. पण, अशाने पुन्हा एकदा राजकीय महत्व वाढण्याचे आणि विरोधकांच्या गोटात खळबळ माजविण्याचे पवारांचे डावपेच आता केव्हाच इतिहासजमा झाले आहेत, हे त्यांच्या लक्षात आले आहे.अत्यंत खळबळजनक म्हणजे हा राजकीय राष्ट्रवादी मेळावा, साहित्यिकांच्या खांद्यावर बंदूक ठेवत भरवला, हे दिल्लीतल्या स्थानिक चाणाक्ष मराठी मंडळींच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. म्हणूनच स्थानिक मराठी दिल्लीकर मंडपात फिरकलेच नाहीत, हे लक्षात येण्यासारखे होते.

### शिंदेंचा सत्कार फडणवीस मोदींना डिवचण्यासाठी?

तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्यांना मुद्दाम पुरस्कृत करून फडणवीस, मोदी यांना खिजवण्याचा, डिवचण्याचा, अस्वस्थ करण्याचा प्रयत्न शरद पवार यांनी केला खरा..पण, ते राजकीय कार्यस्थानही उघडे पडले.

### मोदींनी मात्र अचूक फायदा उठवला

नरेंद्र मोदींनी या संमेलनात सर्वांदेखत अनेक मुद्दे उपस्थित करून शरद पवार यांना चहूबाजूंनी कोंडीत पकडले. संजय नहार यांनी आणून जमवलेले सारेच मोठ्यांदा टाळ्यांचा कडकडाट करायचे, हे देखील पवार आणि नहार यांच्या लक्षात आले असणार. एखाद्या हिंदी सिनेमात ज्याप्रमाणे एखादा प्रियकर आपल्या प्रेयसीला मांडवातून उचलून नेतो आणि नवरदेव केवळ हात चोळत बसतो, त्या नवरदेवासारखी अवस्था शरद पवार आणि संजय नहार यांची झाली असेच म्हणावे लागेल!

### जमलेले समाजवादी मोदींवर झाले खुश..

जमलेले बहुतेक सारे समाजवादी विचारांचे किंवा हिंदुत्व न मानणारे..मोदी यांना हे नेमके माहीत असल्याने त्यांनी सावरकरांपासून तर संघ आणि हिंदुत्वाचे महत्व सांगितले आणि समाजवाद्यांच्या टाळ्या घेतल्या. शरद पवारांच्या मनात अनेकांबद्दल तिटकारा आहे, पवारांच्या नाकावर टिच्चून हिंदुत्वाचे महत्व जाहीरपणे विशद करून मोदींनी फड जिंकला. पवार - नहारांसह साऱ्यांना अस्वस्थ आणि विचलित करण्याचे काम मोदींनी केले. विरोधकांनी कितीही चक्रव्यूह आखले, तरी त्यांचे दात घशात घालण्याइतके मोदी सक्षम आहेत..अशा अनेक घटना अजून घडायच्या आहेत, पवारांना तोंडावर पाडून मोदींना जिंकायचे आहे..राजकीय खेळ अजून संपलेला नाही, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे यासाठी 'ऑपरेशन टायगर'?

## एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून हा प्रयत्न सुरू

। परभणी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मंत्र्यांकडून ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांचे खासदार आणि पदाधिकारी फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. उद्धव ठाकरेंचे खासदार जर फुटले तर पुन्हा एकदा भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्रीपदी वर्णी लागेल अशी आशा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आहे. त्यामुळेच पुन्हा एकदा मुख्यमंत्री होण्यासाठी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून हा प्रयत्न केला जात आहे. पण उद्धव ठाकरे यांचे आम्ही नऊ खासदार एकनिष्ठ आहोत, आम्ही फुटणार नाहीत. माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सोडणार नाही, असे म्हणत खासदार संजय जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मुख्य हेतूच सर्वांसमोर आणला आहे.**



परभणीच्या गंगाखेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत खासदार संजय जाधव बोलत होते. यावेळी ऑपरेशन टायगर विषयी पत्रकारांनी विचारले असता खासदार संजय जाधव यांनी संपूर्ण घटनाक्रम सांगितला. दिल्लीमध्ये अधिवेशन सुरू असताना वेगवेगळ्या मंत्र्यांकडे किंवा वेगवेगळ्या पक्षांच्या खासदारांकडे स्नेहभोजनांचे आयोजन केले जाते, अशा स्नेहभोजनाला आम्ही जात असतो, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडेही स्नेहभोजनासाठी आमंत्रण आले होते आणि मी तेथेही भेटण्यासाठी गेलो होतो. त्यानंतर मंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे देखील स्नेहभोजनासाठी निमंत्रण आले होते आणि मी त्या दिवशी त्यांच्याकडे जाऊन भेट घेऊन आलो होतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आमदार आदित्य ठाकरे हे दिल्लीत आले होते आणि त्यानंतर आम्ही त्यांच्यासोबत होतो. पण त्याच वेळेस माध्यमांच्या प्रतिनिधींनी ऑपरेशन टायगर सुरू असल्याचे सांगत माजी आणि मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट झाली असल्याचे जाहीर केले. पण यामध्ये काहीही तथ्य नसल्याचे मी प्रसारमाध्यमांना सांगितले आहे असेही खासदार संजय जाधव म्हणाले. उद्धव ठाकरेंशी आम्ही सर्व खासदार एकनिष्ठ आहोत आणि आमचा फुटण्याचा प्रश्नच येत नाही असेही संजय जाधव म्हणाले.

"नीलम गोऱ्हे हे दिल्लीच्या व्यासपीठांवरुन एक वाक्य बोलल्या आता ते व्यासपीठ बरोबर होतं की चुकीचं होतं हा भाग वेगळा. परंतु ते काही जणांना एवढं झोंबलं की मिरच्या लागल्या. हा एकनाथ शिंदे त्यांना पुरुन उरला होता. गोऱ्हेंनी त्यांचे काळे धंदे बाहेर काढेल, त्यामुळे त्यांना मिरची लागली. "जेव्हा आम्ही उठाव केला, तेव्हाला रोज आम्हाला शिव्याशाप दिले. मी कधीही आरोपाला उत्तर दिलं नाही. मी कामातून उत्तर दिले. त्यामुळे महायुती सरकार लोकप्रिय ठरलं.

### शिंदेंकडून नीलम गोऱ्हेंची पाठराखण

दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील एका चर्चासत्रात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ठाकरे गटावर टीका केली होती. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचं, असा खळबळजनक आरोप डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केला. या आरोपानंतर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी नीलम गोऱ्हे यांना अब्रू नुकसानीची कायदेशीर नोटीस बजावली आहे. यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे यांनी नुकतंच मुंबईतील एका कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी जोरदार भाषण केले.

### मग तुम्ही किती गाड्या दिल्या?

नीलम गोऱ्हे तुम्ही चार टर्म आमदार राहिलातनीलम गोऱ्हे यांना पक्षाने विधान परिषदेवर चार वेळेस आमदार केले. त्यांच्यावर पक्षाने एवढी कृपादृष्टी दाखवूनही त्या पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर बोलत आहेत. तुम्ही चार वेळेस आमदार झालात मग तुम्ही आठ गाड्या दिल्या का? असा सवालही संजय जाधव यांनी उपस्थित केला. तसेच ते म्हणाले की आपण खाल्ल्या मीठाला जागलं पाहिजे, आपल्याला ठाकरे कुटुंबीयांनी एवढे भरभरून दिला असताना त्यांच्यावर चिखलफेक करणे योग्य नाही, असे म्हणत नीलम गोऱ्हे यांच्या वक्तव्याचा खासदार संजय जाधव यांनी समाचार घेतला.

---

# लाडक्या बहिणांना मोठा धक्का!

## काँग्रेस खासदार कल्याण काळे यांचे धडकी भरणारे विधान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रातील महायुती सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेची सध्या सातत्याने चर्चा सुरु आहे. लाडकी बहीण योजनेतंर्गत महिलांना दर महिना १५०० रुपये देण्यात येतात. विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवून 2100 रुपये देऊ असे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. मात्र अद्याप हे पैसे देण्यात आलेले नाहीत. त्याच आता काँग्रेस खासदाराने लाडकी बहीण योजनेबद्दल एक मोठे विधान केले आहे. यामुळे लाडक्या बहिणींना धक्का बसला आहे.**



काँग्रेस खासदार कल्याण काळे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना विविध मुद्द्यांवर भाष्य केले. आज सकाळी मी खरपुडीला जाऊन आलो आणि तेथील शेतकऱ्यांची सविस्तरपणे संवाद साधलेला आहे. परंतु तेथील शेतकऱ्यांची कैफियत जाणून घेताना त्या शेतकऱ्यांनी असं सांगितलं की जो भाव इतरांना दिला आहे. तोच दर आम्हाला मिळावा अशी आमची रास्त मागणी आहे. त्यामुळे त्यांच्या मागणीला आम्ही पाठिंबा दिला असल्याचं कल्याण काळे यांनी म्हटले.

"उद्धव ठाकरे साहेबांवर जो काही आरोप नीलम गोरे यांनी केलेला आहे. आज आरोप करण्याच्या वेळी त्यांनी त्या वेळेला असा घटनाक्रम झालेला आहे, असं त्याच वेळी बोलायला पाहिजे होतं. आता नीलम गोरे उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून निघून गेल्यावर असं आरोप करायला लागल्यात. राज्याच्या सर्वोच्च सभागृह असलेल्या विधान परिषदेच्या उपसभापतींना असं वक्तव्य करणे लोकशाहीला लाजिरवाणा आहे", असेही कल्याण काळे म्हणाले.

"विजय वडेट्टीवार काय बोलले मला माहित नाही. परंतु आपल्या महाराष्ट्राला साधू संतांची परंपरा लाभलेली आहे आणि याच साधुसंताच्या परंपरेमध्ये आपण सगळे येतो. त्यामुळे अशा पद्धतीचं काही बोललं गेलं असेल, तर ते बोललं जाऊ नये या मताचा मी आहे", असेही कल्याण काळेंनी म्हटले.

### कल्याण काळे काय म्हणाले?

लाडकी बहिण योजनेबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर कल्याण काळेंनी प्रतिक्रिया दिली. "लाडकी बहिण योजना मतं खरेदी करण्यापुरती होते. यामुळे सरकारच्या तिजोरीवर मारलेला डल्ला आणि त्याच तिजोरीवरून आपल्या स्वतःसाठी मतं खरेदी करण्याचं काम या महायुती सरकारने केलं", असा हल्लाबोल खासदार कल्याण काळे यांनी केला. "लाडक्या बहिणी योजनेला फक्त गोंडस नाव दिले. त्यामुळे मी तुम्हाला खात्री देतो की ही योजना बंद होणार आहे", असे विधान कल्याण काळेंनी केले. "हळूहळू या सरकारचे नाव युती सरकारऐवजी चौकशी सरकार असं नाव ठेवलं, तर योग्य होईल" असा टोलाही खासदार कल्याण काळे यांनी लगावला.

# दिल्ली विधानसभेत गदारोळ!

## आतिशी यांच्यासह 'आप'चे 11 आमदार निलंबित; दिवसभरासाठी कारवाई

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ईशान्य भारतातील राज्य आसाम अलीकडच्या काळात वेगाने विकसित होत आहे. आसामच्या विकासाचा हा वेग आता आणखी वाढणार आहे. 'ॲडव्हान्टेज आसाम २.० इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर समिट २०२५' या परिषदेला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य व मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यावेळी उपस्थित होते. या बिझनेस समिटमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी, अदाणी समूहाचे प्रमुख गौतम अदाणी, जेएसडब्ल्यू समूहाचे सज्जन जिंदाल, एस्सारचे प्रमुख प्रशांत रुइया, वेदांताचे अनिल अग्रवाल यांच्यासह देश-विदेशातील अनेक मोठमोठे उद्योजक सहभागी झाले आहेत. या बिझनेस समिटच्या माध्यमातून आसाममध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणार आहे.**



दिल्लीत भाजपाने ४८ जागी विजय मिळवत एकहाती सत्ता काबीज केली आहे. दरम्यान २७ फेब्रुवारीपर्यंत विशेष अधिवेशन असणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणा दरम्यान आप म्हणजेच आम आदमी पार्टीच्या आमदारांनी जोरदार गदारोळ केला. ज्यानंतर दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंद्र गुप्ता यांनी आपच्या १२ आमदारांचं निलंबन केलं आहे. दरम्यान दिल्ली विधानसभेत कॅगचा अहवाल सादर झाला आहे. या अहवालात शीशमहल, मद्य घोटाळा याबाबत महत्त्वाचे उल्लेख आहेत. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला आहे.अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री असताना शीशमहल वर करोडो रुपये खर्च करण्यात आल्याचा उल्लेख या अहवालात आहे. तसंच मद्य धोरणामुळे हजारो कोटींचं नुकसान झाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे

आम आदमी पक्षाला मद्य धोरण बदलण्यापूर्वी काही तज्ज्ञांनी महत्त्वाचे सल्ले दिले होते. मात्र त्यातला कुठलाही सल्ला विचारांत घेतला गेला नाही. तज्ज्ञांच्या समितीने दिलेल्या अहवालाकडे डोळेझाक करण्यात आली. असंही कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

### कॅग अहवालातले ठळक मुद्दे काय?

नव्या महसूल धोरणामुळे दिल्ली सरकारला २००० कोटींचं नुकसान झालं

नव्या मद्य धोरणाच्या आधी एका व्यक्तीला एकच परवाना मिळत होता. नव्या धोरणानुसार एक व्यक्ती दोन डझन परवाने घेण्यास पात्र होता.

दिल्लीत नव्या मद्य धोरणाच्या आधी ६० टक्के मद्य विक्री ही चार सरकारी कॉर्पोरेशनद्वारे केली जात होती. नव्या धोरणानंतर खासगी कंपन्यांनी विक्री परवाने घेतले.

अरविंद केजरीवाल सरकारच्या मद्यधोरणात २००२ कोटी बुडाले, CAG चे ताशेरे; मुख्यमंत्री रेखा गुप्तांनी मांडला अहवाल!

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या बहुमतानंतर दिल्लीत भारतीय जनता पक्षाचं सरकार स्थापन झालं, तर आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागल्यामुळे दिल्लीत 'आप' विरोधी पक्षाच्या भूमिकेत आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर सोमवारपासून दिल्लीत विशेष अधिवेशन सुरु झालं आहे. या अधिवेशनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी मोठा गदारोळ पाहायला मिळाला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या कार्यालयामधून शहीद भगतसिंग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हटवल्याचा दावा विरोधी पक्षनेत्या अतिशी यांनी केला. यावरून चांगलंच राजकारण तापलं. यातच आज (२५ फेब्रुवारी) दिल्ली सरकारने कॅगचा अहवाल विधानसभेत सादर केला आहे. या अहवालात 'आप' सरकारच्या कारभाराच्या संदर्भात मोठा खुलासा करण्यात आला आहे.

दिल्ली विधानसभेत कॅगचा जो अहवाल सादर झाला त्या कॅगच्या अहवालात असं म्हणण्यात आलं आहे की मद्य धोरणामुळे दिल्ली सरकारचं २ हजार कोटींहून अधिक नुकसान झालं. स्थानिक परवान्यांमध्ये सूट दिली गेल्याने ९४१ कोटींचं नुकसान झालं. तर निविदा न काढल्याने सुमारे ८९० कोटींचं नुकसान झालं. "भाजपाने त्यांचा खरा चेहरा संपूर्ण देशाला सोमवारी दाखवला.

### 12 आमदारांचं निलंबन

दिल्लीत भाजपाने ४८ जागी विजय मिळवत एकहाती सत्ता काबीज केली आहे. दरम्यान २७ फेब्रुवारीपर्यंत विशेष अधिवेशन असणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणा दरम्यान आप म्हणजेच आम आदमी पार्टीच्या आमदारांनी जोरदार गदारोळ केला. ज्यानंतर दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंद्र गुप्ता यांनी आपच्या १२ आमदारांचं निलंबन केलं आहे.

# अंबानी-अदाणी आसाममध्ये 1,00,000 कोटी गुंतवणार!

## रिलायन्स इंडस्ट्रीज पुढील 5 वर्षांत आसाममध्ये 50,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ईशान्य भारतातील राज्य आसाम अलीकडच्या काळात वेगाने विकसित होत आहे. आसामच्या विकासाचा हा वेग आता आणखी वाढणार आहे. 'ॲडव्हान्टेज आसाम २.० इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर समिट २०२५' या परिषदेला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य व मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यावेळी उपस्थित होते. या बिझनेस समिटमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी, अदाणी समूहाचे प्रमुख गौतम अदाणी, जेएसडब्ल्यू समूहाचे सज्जन जिंदाल, एस्सारचे प्रमुख प्रशांत रुइया, वेदांताचे अनिल अग्रवाल यांच्यासह देश-विदेशातील अनेक मोठमोठे उद्योजक सहभागी झाले आहेत. या बिझनेस समिटच्या माध्यमातून आसाममध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणार आहे.**



आसामची राजधानी गुवाहाटीमध्ये या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी व अदाणी समूहाचे प्रमुख गौतम अदाणी यांनी मोठ्या घोषणा केल्या. भारतातील हे दोन्ही मोठे उद्योजक व त्यांच्या कंपन्या आसाममधील विविध व्यवसाय क्षेत्रात गुंतवणूक करणार आहेत. दोन्ही उद्योजकांनी आसाममध्ये प्रत्येकी ५० हजार कोटी रुपये गुंतवणार असल्याचं जाहीर केलं आहे. रिलायन्स व अदाणी समूह राज्यात १,००,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत.

### पायाभूत सुविधांच्या विकासासाठी 50 हजार कोटी

अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी म्हणाले, "आमचा समूह या राज्यात येत्या पाच वर्षांत ५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करेल. राज्यातील विमानतळं, एअरोसिटी, सिटी गॅस वितरण, ट्रान्समिशन, सिमेंट व रस्त्यांचे प्रकल्प, उड्डाणपूलांच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करेल".

रिलायन्स इंडस्ट्रीज आसाममध्ये ५० हजार कोटी रुपये गुंतवणार

मुकेश अंबानी या कार्यक्रमाला संबोधित करताना म्हणाले, "आमची रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनी पुढील पाच वर्षांत आसाममध्ये ५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. मी ऊर्जा व सृजनाची देवी माता कामाख्याकडे प्रार्थना करतो की त्यांनी केवळ आसामच नव्हे तर संपूर्ण भारताला आशीर्वाद द्यावा. आगामी काळात आम्ही आसाम राज्याला तंत्रज्ञानाचा स्वर्ग बनवू. आसाममधील तंत्रज्ञानप्रेमी तरुण आर्टिफिशियल इंटेलिजन्सला नवा अर्थ देतील".

# हिंदू धर्मातील प्रमुख सण महाशिवरात्री!

**भारत देशात महाशिवरात्री हा एक हिंदूंचा एक प्रमूख सण आहे. जो दरवर्षी फेब्रुवारी ते मार्च दरम्यान श्री शिवांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. हिंदू दिनदर्शिकेनुसार हा सण फाल्गुन महिन्याच्या पूर्वार्धाच्या चौदाव्या दिवशी साजरा केला जातो. यंदा २०२५ मध्ये महाशिवरात्री सण हा बुधवार, २६ फेब्रुवारी रोजी आला आहे. हा सण श्री शिव आणि श्री पार्वतीच्या लग्नाचे स्मरण करतो, आणि या प्रसंगी शिव त्याचे दैवी तांडव नृत्य करतात. हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. जो जीवनात आणि जगामध्ये “अंधार आणि अज्ञानावर मात करण्याचे” स्मरण आहे. या दिवशी श्री शिवाचे स्मरण करतात आणि प्रार्थना, उपवास, नैतिकता आणि सद्गुणांचे मनन करून साजरा केला जातो. भाविक एखाद्या शिवमंदिराला भेट देतात किंवा ज्योतिर्लिंगाच्या यात्रेला जातात. या सणाची उत्पत्ती ५ व्या शतकात झाली असे मानले जाते.**

## महाशिवरात्री विशेष





**महाशिवरात्रीची प्राचीनता आणि महत्त्व -**
संस्कृत पुराण साहित्यापैकी अग्नी पुराण, शिव पुराण, पद्म पुराण या ग्रंथांमध्ये महाशिवरात्री व्रताचे महत्त्व सांगितले आहे. या दिवशी बेलाची पाने वाहून शिवाची पूजा करावी, असे या व्रताचे स्वरूप आहे. हा सण जगभरातील हिंदू बांधव साजरा करतात. या दिवशी ते महादेवाची पूजा करतात. बरेच भाविक त्यांच्या जवळील ज्योतिर्लिंगाला जाऊन दर्शन घेतात. महाशिवरात्रीच्या निमित्ताने भारतभरात विविध तीर्थक्षेत्रे, तसेच प्रामुख्याने बारा ज्योतिर्लिंगांच्या स्थानी विशेष यात्रा भरतात.

**महाशिवरात्रीची आख्यायिका-**
महाशिवरात्रीला भगवान शंकराने तांडवनृत्य केले अशीही एक आख्यायिका प्रचलित आहे. एक शिकारी होता. तो शिकार करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत असे. एके रात्री तो शिकारीला गेला आणि झाडावर चढून बसला. ते झाड बेलाचे होते आणि त्याखाली शिवलिंग होते. सावज नीट दिसावे म्हणून शिकारी झाडाची पाने खुडून खाली टाकू लागला. नेमकी ती बेलाची पाने त्याच्या नकळत खालच्या शिवलिंगावर पडत राहिली. पहाटे एक हरीण तिथे आले. शिकारी त्यावर बाण मारणार तोवर हरीण म्हणाले मी माझ्या कुटुंबाला भेटून येतो. त्यानंतर हरणाचे सर्व कुटुंब तिथे आले आणि सगळीच म्हणू लागली- “मला मार पण इतरांना सोडून दे.” हे पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने त्या कुटुंबाला निघून जाऊ दिले आणि नंतर त्याने शिकार करणे सोडून दिले. त्याच्या नकळत त्याला त्या रात्री उपवास घडला, पूजा झाली आणि व्रत झाले त्यामुळे तो पावन झाला.

**महाशिवरात्रीला पुजा कशी करतात?**
महाशिवरात्रीला शिवलिंगाची विशेष पूजा होते. पंचगव्य म्हणजे गायीचे दूध, तूप, शेण, गोमूत्र आणि दही लावून शिवलिंगाला अभिषेक करतात. त्यानंतर दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचामृताने शिवलिंगावर लेप देतात. त्यानंतर धोत्रा आणि बेलाची पाने तसेच पांढरी फुले वाहून पूजा करतात. शिवलिंगावर चक्का थापण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने भाविक उपवास करतात. काही भक्त दूध आणि फळे असा आहार घेतात. प्रसादासाठी विविध प्रकारचे पदार्थ तयार करून ते शंकराला अर्पण केले जातात. खीर, पंचामृत, दूध आणि दुधापासून केलेले पदार्थ नैवेद्यासाठी तयार केले जातात.

**महाशिवरात्री सण कसा साजरा केला जातो?**
शिवरात्रीच्या रात्री काही प्रांतात भाविक दुधामध्ये भांग मिसळून त्याचे सेवन करतात. दुधामध्ये सुकामेवा वाटून घालतात आणि ते मसाला दूध पिण्याची पद्धतीही प्रचलित आहे. याला थंडाई असे म्हणले जाते.

महाशिवरात्री पूजेसाठी आवश्यक अशी सामग्री दुकानांमध्ये भाविकांसाठी उपलब्ध करून दिली जाते. भस्म, रुद्राक्ष, रुद्राक्षमाला, त्रिशूल, शंकराच्या मूर्ती, शिवलिंगे, डमरू अशा विविध गोष्टी विक्रीसाठी उपलब्ध असतात. बेलाची पाने, पांढरी फुले, हार यांचीही विक्री या दिवशी केला जाते. हा सण देशाच्या विविध भागात विविध पद्धतीने साजरा केल जातो.

**महाशिवरात्रीची आख्यायिका-**
महाशिवरात्रीला भगवान शंकराने तांडवनृत्य केले अशीही एक आख्यायिका प्रचलित आहे. एक शिकारी होता. तो शिकार करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत असे. एके रात्री तो शिकारीला गेला आणि झाडावर चढून बसला. ते झाड बेलाचे होते आणि त्याखाली शिवलिंग होते. सावज नीट दिसावे म्हणून शिकारी झाडाची पाने खुडून खाली टाकू लागला. नेमकी ती बेलाची पाने त्याच्या नकळत खालच्या शिवलिंगावर पडत राहिली. पहाटे एक हरीण तिथे आले. शिकारी त्यावर बाण मारणार तोवर हरीण म्हणाले मी माझ्या कुटुंबाला भेटून येतो. त्यानंतर हरणाचे सर्व कुटुंब तिथे आले आणि सगळीच म्हणू लागली- “मला मार पण इतरांना सोडून दे.” हे पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने त्या कुटुंबाला निघून जाऊ दिले आणि नंतर त्याने शिकार करणे सोडून दिले. त्याच्या नकळत त्याला त्या रात्री उपवास घडला, पूजा झाली आणि व्रत झाले त्यामुळे तो पावन झाला.

**पुजा कशी करतात?**
महाशिवरात्रीला शिवलिंगाची विशेष पूजा होते. पंचगव्य म्हणजे गायीचे दूध, तूप, शेण, गोमूत्र आणि दही लावून शिवलिंगाला अभिषेक करतात. त्यानंतर दूध, दही, तूप, मध आणि साखर या पंचामृताने शिवलिंगावर लेप देतात. त्यानंतर धोत्रा आणि बेलाची पाने तसेच पांढरी फुले वाहून पूजा करतात. शिवलिंगावर चक्का थापण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. महाशिवरात्रीच्या निमित्ताने भाविक उपवास करतात. काही भक्त दूध आणि फळे असा आहार घेतात. प्रसादासाठी विविध प्रकारचे पदार्थ तयार करून ते शंकराला अर्पण केले जातात. खीर, पंचामृत, दूध आणि दुधापासून केलेले पदार्थ नैवेद्यासाठी तयार केले जातात.

# आपणच चॅम्पियन आहोत!

## पाकिस्तानच्या कर्णधाराचं डोकं फिरलं'; मोहम्मद रिझवानचं पराभवानंतर अजब वक्तव्य

। दुबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताकडून झालेला पराभव पाकिस्तानच्या एवढ्या जिव्हारी लागेल, असे कोणालाही वाटले नव्हते. भारताच्या पराभवानंतर पाकिस्तानचे आव्हान संपुष्टात आले. पण या पराभवानंतर पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानचं डोकं फिरल्याचं पाहायला मिळत आहे. या पराभवानंतर तो आपणच चॅम्पियन असल्याचा तोरा मिरवत आहे. रिझवान पाकिस्तानच्या खेळाडूंसमोर नेमकं काय म्हणाला, याचा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल झाला आहे.**



पाकिस्तानच्या पराभवानंतर कर्णधार मोहम्मद रिझवान टिकेचं लक्ष्य ठरत आहे. आपल्यावर ही जोरदार टीका होत असली तरी रिझवान त्यानंतर पाकिस्तानच्या ड्रेसिंग रुममध्ये जे काही बरळला आहे, हे त्यापेक्षा भनायक असल्याचे समोर आले आहे. भारताकडून झालेला पराभव जिव्हारी लागल्यावर एखादा कर्णधार आपल्या खेळाडूंचे सांत्वन करताना पाहायला मिळाला असता. पण यावेळी तर मोहम्मद रिझवानने ड्रेसिंग रुममध्ये जोरदार सेलिब्रेशन केल्याचे व्हायरल व्हिडिओमध्ये पाहायला मिळत आहे.

**नेमकं म्हणाला तरी काय...**

या पाकिस्तानच्या ड्रेसिंग रुममधील व्हायरल व्हिडिओमध्ये कर्णधार मोहम्मद रिझवान म्हणाला आहे की,“ मित्रांनो, पाहा दु:ख सर्वांनाच आहे. ही गोष्ट मलाही माहिती आहे. पण आता आपण सर्व आपल्यासाठी टाळ्या वाजवणार आहोत आणि टाळ्या अशा वाजल्या पाहिजेत की, आपणच चॅम्पियन आहोत. सर्वांनाच माहिती आहे की, आपणच चॅम्पियन आहोत. “ मोहम्मद रिझवानने असं म्हटल्यावर पाकिस्ताच्या ड्रेसिंग रुममध्ये जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. एखादा मोठा सामना जिंकल्यावर जसा एखादा संघ सेलिब्रेशन करतो, तसं पाकिस्तानचा संघ यावेळी सेलिब्रेशन करत असल्याचे पाहायला मिळत होते. भारतासारखअया पारंपरिक प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध पराभूत झाल्याचे शल्य कुठेच मोहम्मद रिझवान असो किंवा पाकिस्तानचे खेळाडू असो, त्यांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळत नव्हते. यावेळी सर्व जण जोरदार टाळ्या नेमक्या कशासाठी वाजवत होते, याचे कोडे अद्याप कोणालाही सुटलेले नाही.

पाकिस्तानचा संघ भरताविरुद्ध जेव्हा पराभूत झाला होता, तेव्हाच त्यांचे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले होते. पण त्यांना फक्त एकच आशा बांगलादेशच्या सामन्यावर होती. बांगलादेश सामना जिंकला असता तर त्यांचे आव्हान कदाचित कायम राहीले असते. पण न्यूझीलंडने बांगलादेशचा पराभव केला आणि त्यानंतर पाकिस्तानचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेबाहेर गेल्याचे पाहायला मिळाले.

### पाकिस्तानने काय शिकायला हवं...

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना एकतर्फी झाल्याचे म्हटले जात आहे. कारण पाकिस्तानच्या संघाने भारताविरुद्धच्या सामन्यात जिंकण्याची ईर्षाच दाखवली नाही. पाकिस्तानचा हा आंतरराष्ट्रीय संघ आहे, असे त्यांच्या खेळामधून जाणवले नाही. त्याचबरोबर पाकिस्तानकडून ज्या मोठ्या चुका झाला त्याचा फटका त्यांना या सामन्यात बसल्याचे पाहायला मिळाले. 'गेल्या चार सामन्यांत केलेल्या चुकांची पुनरावृत्ती केली. भारतीयांनी आमच्यापेक्षा जास्त सरस प्रयत्न केले. त्यांचा खेळ खूपच धाडसी होता. ज्या वेळी आक्रमकता दाखवण्याची गरज होती, त्या वेळी ती दाखवू शकलो नाही,' अशी कबुली पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवाने याने दिली. चॅम्पियन्स करंडक वन-डे क्रिकेट स्पर्धेत पाकचा संघ रविवारी पराभूत झाल्यानंतर पाकच्या कर्णधाराने ही टिप्पणी केली होती. पाकिस्तानच्या संघाने फलंदाजीत क्वचितच आक्रमकता दाखवली.

# बीसीसीआयचा खेळाडूंबाबत मोठा निर्णय!

## चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु असताना आता करावी लागणार डबल मेहनत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु असतानाच बीसीसीआयने भारतीय खेळाडूंबाबत आता एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंना आता डबल मेहनत घ्यावी लागणार असल्याचे आता समोर आले आहे.**



भारताने जेव्हा बांगलादेशला पराभूत केले होते, तेव्हा ते दुसऱ्या स्थानावर होते. पण पाकिस्तानवर दमदार विजय मिळवल्यावर त्यांनी अव्वल स्थान पटकावले होते. पण त्यानंतर न्यूझीलंडने बांगलादेशला नमवले आणि ते अव्वल स्थानावर पोहोचले आहेत. त्यामुळे भारतीय संघ आता दुसऱ्या स्थानावर आहे. पण जर भारताने न्यूझीलंडला पराभूत केले तर त्यांना पुन्हा पहिले स्थान मिळवता येऊ शकते.

**बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु असताना निर्णय घेतला..**

चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु असताना आता बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयच्या निर्णयामुळे आता खेळाडूंना डबल मेहनत करावी लागणार आहे. कारण आता चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु आहे, त्यानंतर आयपीएल रंगणार आहे. आयपीएलनंतर भारताचा संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर कसोटी मालिका खेळायला जाणार आहे. पण भारतीय संघाला यावेळी कसोटी मालिकेची तयारी करण्यासाठी वेळ कसा मिळणार, हा प्रश्न बीसीसीआयला पडला होता. त्यानंतर त्यांनी आता एक मोठा निर्णय घेतला आहे. बीसीआयने आता असा निर्णय घेतला आहे की, आयपीएल सुरु असताना भारतीय कसोटी संघातील खेळाडूंना थोडा वेगळा वेळ काढावा लागणार आहे, ज्यामध्ये त्यांना कसोटी मालिकेसाठी लाल चेंडूने सराव करावा लागणार आहे. त्यामुळे भारताचे जे खेळाडू कसोटी संघात आहेत त्यांना आता डबल मेहनत घ्यावी लागणार आहे.\

**गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका...**

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी गौतम गंभीर यांच्यावर जोरदार टीका होत आहे. कारण गंभीर हे ऐनवेळी संघात मोठे बदल करत आहेत आणि त्याचाच फटका संघाला बसत असल्याचे म्हटले जात आहे. भारतीय संघात गौतम गंभीर यांनी अस्थिरता निर्माण केली आहे, असा आरोप भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खानने लगावला होता.

### रोहित आणि विराटला मोठा धक्का

ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यानंतर बीसीसीआयने कडक पावलं उचलली होती. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबाबत बीसीसीआय कडकपणे वागताना दिसली. आता चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी रोहित आणि विराट यांना ज्या गोष्टीचा मोठा फटका बसतो, ती गोष्ट बीसीसीआयने केली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीला काही दिवसांतच सुरुवात होत आहे. पण या स्पर्धेसाठी बीसीसीआयने एक मोठा नियम रोहित-विराटसह भारतीय खेळाडूंना पुन्हा एकदा नव्याने सांगितला आहे. बीसीसीआयचा हा नियम सांगतो की, जर कोणताही दौरा ४५ दिवसांपेक्षा जास्त असेल तरच रोहित-विराटसह अन्य खेळाडू आपल्या कुटुंबियांना परेदशी घेऊन जाऊ शकतात. पण चॅम्पियन्स ट्रॉफी ही स्पर्धा ४५ दिवस चालणारी नाही. त्यामुळे रोहित आणि विराटसह कोणत्याही खेळाडूंना आपल्या कुटुंबियांना चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी घेऊन जाता येणार नाही. रोहित आणि विराट यांना या नियमाचा जास्त फटका बसणार आहे. कारण या दोघांच्या कुटुंबियात लहान मुलं आहेत आणि त्यांना आपल्याबरोबर ठेवण्याचा रोहित आणि विराट यांचा प्रयत्न असतो. पण आता चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी रोहित-विराटसह अन्य खेळाडूंना आपल्या कुटुंबियांना घेऊन जाता येणार नाही, असा निर्णय बीसीसीआयने आता घेतला असून तो सर्व खेळाडूंना सांगितला आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
। दि. 26 फेब्रुवारी 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# चिंचवडगावातील 1400 जेष्ठ नागरिकांना

# आयुष्मान भारत वय वंदना 'स्मार्ट कार्डचे वाटप'

## विधायक उपक्रम: भाजपाचे माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांचा पुढाकार

| पिंपरी- चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**| भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने आयुष्मान भारत वय वंदना स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे. आयुष्मान वय वंदना कार्ड हे सामाजिक-आर्थिक स्थिती न पाहता 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण प्रदान करते. हे कार्ड सुमारे 2000 वैद्यकीय प्रक्रियांचे उपचार देते आणि कोणत्याही प्रतीक्षा कालावधीशिवाय पहिल्या दिवसापासून सर्व विद्यमान आजारांना कव्हर करते.**

आतापर्यंत नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या माध्यमातून १४०० पेक्षा जास्त जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

नगरसेवक शेडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयात दररोज ७० पेक्षा जास्त वय असलेल्या जेष्ठ नागरिकांना आयुष्यमान भारत वय वंदना या योजनेचे लाभार्थी करून घेतले जाते व त्यांना मोफत स्मार्ट कार्ड दिले जाते. आयुष्यमान भारत 'वय वंदना विमा' योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित स्वतः व्यक्ती व त्याचे आधारकार्ड आणि आधारकार्डला लींक असलेला मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.



# निगडी येथे पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया

## आयुक्त शेखर सिंह ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पिंपरी-चिंचवड : निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी ड्रिल मशीन पोकलॅण्ड ने रस्त्यावर बोरिंग खोदण्यात येत असताना त्या ठिकाणी पाणी पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया गेले आहे.**

या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन मेट्रो रेल्वे ठेकेदार ह्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी पिंपरी चिंचवड शहर भाजपाचे चिटणीस सचिन काळभोर यांनी केली आहे.

निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी ड्रिल मशीन पोकलॅण्डने रस्त्यावर खड्डे खोदताना पाणी पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया गेले आहे. सध्या उन्हाळा सुरू असून शहरात पाण्याचा तुटवडा भासत असल्याने मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी हजारो लिटर पाणी वाया गेले आहे, त्या संदर्भात ताबडतोब दखल घेऊन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे.



## पिंपळे गुरव येथील संत गाडगेबाबा

# ज्येष्ठ नागरिक संघातर्फे स्वच्छता अभियान!

### शासन पुरस्कार प्राप्त अरूण पवार सहकाऱ्यांसह स्वच्छता अभियानात सहभागी

। पिंपळे गुरव । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघ काशीद पार्क पिंपळे गुरव यांच्यावतीने कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे संत "गाडगेबाबा" यांच्या 149 व्या जयंती निमित्त संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर काशीद पार्क व बीआरटी रोड येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच छत्रपती शिवाजी महाराज वनश्री महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त अरुण पवार आपल्या सहकाऱ्यांसह स्वच्छता अभियानात भाग घेतला. पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्मचारी राहुल ओव्हाळ व इतर स्वच्छता कर्मचारी यांनी या कामी उत्तम सहकार्य केले.**




यावेळी संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्रीकृष्णा फिरके काशीद म्हणाले की, 2016 मध्ये काशीद पार्क येथे 2 ते 3 ट्रक एवढा कचरा होता की लोकांना जाताना नाक दाबून जावे लागत होते. त्यावेळी वृक्षमित्र अरुण पवार व तानाजी जवळकर यांच्या सहकार्यातून पत्राशेडची उभारणी करून कचरा टाकायच्या जागी ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय सुरू केले. स्वच्छता करून त्या ठिकाणी 1 महिनाभर माणूस ठेऊन त्याठिकाणी 6 ते 7 हजार लोकांचे आरोग्य धोक्यात यायचे थांबले. तसेच 2016 च्या स्वच्छता अभियानांतर्गत काशीद पार्क मधील सर्व गल्ल्या, आळंदी, शिरगाव, देहूगाव, गडकिल्ले या ठिकाणी आम्ही सर्वांनी मिळून स्वच्छता अभियान राबविले याबद्दल त्यांनी वृक्षमित्र अरुण पवार यांचे आभार मानले. तसेच यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार यांनी प्रथम संत गाडगेबाबा यांना अभिवादन केले व उपस्थिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी यांचेही आभार मानले. कारण स्वच्छता कर्मचारी रोजच स्वच्छता ठेवतात, तेच खरी देशसेवा करतात. तसेच त्यांनी उपस्थित पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी यांना गुलाबाचे पुष्प देऊन सत्कार केला. शेवटी बोलताना अरुण पवार म्हणाले संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री कृष्णा फिरके काका यांनी सुरुवात स्वतःपासून केली व त्यांचे कार्य युवकांनाही लाजवेल असे आहे. कुठलीही जाहिरात न करता त्यांनी सेवा केलेली आहे. तसेच त्यांनी यावेळी प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीचा रविवार किंवा शेवटचा रविवार ज्येष्ठ नागरिकांच्या माध्यमातून आळंदी, देहू, प्रती शिर्डी शिरगाव तसेच गड किल्ले येथे स्वच्छता अभियान सुरुवात करण्याचा संकल्प केला.

स्वच्छ सर्वेक्षण 2023 व 2024 या दोन्ही वर्षात संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघास महानगरपालिकेतर्फे स्वच्छता पुरस्कार देऊन गौरवण्यात येते आजच्या कार्यक्रमात पीसीएमसी पुरस्कृत स्वच्छता चॅम्पियन संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण फिरके, सूर्यकांत भागवत, सूर्यकांत कुरुलकर, दामू राणे, चांदमल सिंघवी, पोपट अण्णा चव्हाण, दौलतराव जाधव, गणेश ठाकरे, शंकर टोपे, विशाल कुंभार, श्रीधर राऊत, श्रीधर साबळे, धनेश कुमार पुरोहित, मोहन भोईटे, दत्तात्रय पाटकर, पितांबर सरोदे, श्री जैन, अशोक नवगण, सुरेश दिघे , अनिल भोळे, श्री.शत्रुघन धुळे, श्री.आनंदराव वानखेडे, दत्तात्रय खताळ, बाळासाहेब वाघ, संजय पाडेकर इत्यादी सदस्य हजर होते सर्वांनी तरुणांच्या जोशात स्वच्छता अभियानात भाग घेतला नंतर चहा पाणी होऊन दौलतराव जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

---

## महापालिका दवाखाना अन् प्रसुतीगृह या प्रकल्पाची पायाभरणी

### माजी आ. अश्विनी जगताप यांची उपस्थिती : अत्याधुनिक सोयी-सुविधांचा 9 मजली दवाखाना

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड : किवळे येथील मनपा आरक्षण क्रमांक ०४/१२० दवाखाना व प्रसुतीगृह या प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ आज सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता चिंचवड विधानभेच्या माजी आमदार श्रीमती अश्विनीताई लक्ष्मण जगताप यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.**



या कार्यक्रमास रा.कॉ.पार्टी शराध्यक्ष, माजी महापौर योगेश बहल, स्थानिक ज्येष्ठ नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, मा.नगरसेविका संगीता भोंडवे, मा.नगरसेविका कु.प्रज्ञा खानोलकर, मा.नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, महानगरपालिका नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड, तसेच स्थानिक ग्रामस्थ, मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन समारंभ संपन्न झाला.

सदर दवाखाना व प्रसुतीगृह हे ६ मजली इमारत असून खास महिलांसाठी अत्याधुनिक सुख सोयी युक्त असे असून सदर दवाखान्यामध्ये तज्ञ डॉक्टरांची ओपीडी सुविधा, महिला व लहान मुले रक्त तपासणी अत्याधुनिक लॅब, अत्यावश्यक विभाग, डायग्नोस्टिक, पॅथ लॅब आणि कुटुंब नियोजन केंद्र, मल्टीपर्पज हॉल, जनरल वॉर्ड तसेच आधी सुविधांचा समावेश आहे. या दवाखान्याचा लाभ देहूरोड, मामुर्डी, किवळे, रावेत व इतर नजीकच्या लोकवस्तीस होणार आहे.